

कोल्हापूर : ताराराणी विद्यापीठात कार्यक्रमप्रसंगी बोलताना पालकमंत्री चंद्रकांत पाटील. व्यासपीठावर डॉ. जे. बी. पाटील, प्रा. डॉ. क्रांतीकुमार पाटील, डॉ. एस. एन. पवार, ॲड. प्रकाश हिलगे. (छाया : पप्पू अत्तार )

# घनकचरा, सांडपाण्यापासून वीजनिर्मिती प्रकल्प उभारणार

## पालकमंत्री : ताराराणी विद्यापीठात रूफ टॉप सोलरचे अनावरण

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

वीज बचत व पर्यावरण संतुलनासाठी रूफ टॉपसारखे प्रयोग कौतुकास्पद आहेत. त्याच धर्तीवर घरातून रोज निर्माण होणाऱ्या घनकचरा व सांडपाण्यापासून वीजनिर्मिती करणारे प्रकल्प उभारण्याचा आपला मानस असल्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले. मुलींच्या शिक्षणासाठी भरीव काम करणाऱ्या ताराराणी विद्यापीठाने रूफ टॉपच्या माध्यमातून पर्यावरणाचीही कास धरल्याने करावे तितके कौतुक थोडेच आहे, असेही ते म्हणाले.

ताराराणी विद्यापीठाच्या कमला कॉलेजमध्ये बसवण्यात आलेल्या सोलर रूफ टॉपचे अनावरण पालकमंत्री पाटील यांच्या हस्ते झाले.

यावेळी संस्थेचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. क्रांतीकुमार पाटील, डॉ. जे. बी. पाटील, डॉ. एस. एन. पवार, ॲड. प्रकाश हिलगे, प्राजक्त पाटील, सचिन पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.